# बोरीवलीतील ग्लोबल पॅगोडाला पर्यटकांची गर्दी



**बोरीवली** | दि. १६ (प्रतिनिधी)

**दिवाळी** सुटीचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक विविध ठिकाणच्या रम्य स्थळांना भेट देत आहेत. काही पर्यटकांनी बोरीवली पश्चिमेला असलेल्या ग्लोबल पॅगोडा मंदिरास आपला पिकनिक पॉइंट बनवला असून, येथे येणाऱ्यांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. गोराई खाडीपलीकडे निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या पॅगोड्याच्या शेजारी भारतातील प्रमुख विपश्यना साधना केंद्रांपैकी एक विपश्यना केंद्रदेखील आहे. आपण आपले जीवन संतुलित कसे ठेवावे, समतोल जीवन कसे जगावे याचा अभ्यास करण्यासाठी जगभरातून पर्यटक येथे येत असतात. ब्रह्मदेशातील श्वे डगोन पॅगोडा या मंदिराच्या प्रतिकृतीसारखे हे स्मारक आहे. ब्रह्मदेशातील अनेक श्रेष्ठ मार्गदर्शकांनी गेली कित्येक वर्षे अखंड विश्वातील जनहितार्थ विपश्यना विद्या शुद्ध स्वरूपात जपून ठेवण्याचे महान कार्य केले आहे. भारतात जुलै १९६९मध्ये गोयंकाजींनी विपश्यना साधना शिबीर घेण्यास सुरुवात केली. विपश्यना साधना अभ्यासासाठी भारतात त्यांनी २१ केंद्रे स्थापन केली आहेत. मुंबईतील पॅगोड्याला बच्चे कंपनीपासून थोरामोठ्यांपर्यंत सर्वच जण चांगला प्रतिसाद देत आहेत.